Estd.1962

'A++' Accredited by NAAC (2021)with CGPA 3.52

**शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर**

संदर्भ क्र..पीजी प्रवेश/ शिवाजी वि.गुण.शिष्य./आरजीडी/ 410 दि. 1 SEP 2021

**परिपत्रक**

**प्रति,**

१. मा.प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये व परिसंस्था

२. मा.अधिविभाग प्रमुख/समन्वयक/संचालक,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषय :— सन २०२०—२०२१ या शैक्षणिक वर्षातील 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती'अर्जाबाबत**

**संदर्भ :—** १. या कार्यालयाचे संदर्भ कं.पीजी प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य./आरजीडी/३४७ दि.०८/०४/२०२१ रोजीचे परिपत्रक.

२ संदर्भ कं.पीजी प्रवेश/शिवाजी वि.गुण.शिष्य./आरजीडी/३५८ दि.१०/०६/२०२१ रोजीचे परिपत्रक.

**महोदय/महोदया,**

उपरोक्त विषय संदर्भात आपणास कळविण्यात येते की, शिवाजी विद्यापीठामार्फत विद्यापीठ संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागामध्ये पदवी व पदव्युत्तर नियमित अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या हुशार, गुणवंत आणि होतकरू विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी एकूण पाच प्रकारामध्ये 'शिवाजी विद्यापीठ गुणवत्ता शिष्यवृत्ती'चे वाटपाच्या अनुषंगाने छाननी समितीने छाननी करून संभाव्य पात्र विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in/ या संकेतस्थळावरील 'Shivaji University Merit Scholarship 2020-2021 या लिंकवरती ठेवण्यात आली आहे.

मार्च/ एप्रिल, २०२० मध्ये विद्यापीठाच्या झालेल्या परीक्षेत जे विद्यार्थी ६० % पेक्षा अधिक गुण मिळवून गुणानुक्रमे पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेले आहेत व पुढील शिक्षणासाठी आपल्या महाविद्यालय/ अधिविभागामध्ये नियमित विद्यार्थी म्हणून प्रवेश घेतलेला आहे अशा विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्तीकरीता वरील परिपत्रकान्वये ऑनलाईन नामांकन अर्ज भरले आहेत. अशा विद्यार्थ्यांचे नामांकन अर्ज छाननी समितीने छाननी करून विद्यार्थ्यांच्या माहितीकरिता विद्यापीठाच्या संकेतस्थळावर ठेवलेल्या संभाव्य पात्र यादीबाबत कांही तक्रारी/सुचना असल्यास विद्यार्थ्यांकडून लेखी स्वरूपात घ्याव्यात व एकत्र करून दि. १५/०९/२०२१ पर्यंत विद्यापीठ कार्यालयात पाठवाव्यात. उशीरा पाठविण्यात आलेल्या तक्रारीबाबत विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

उपरोक्त शिष्यवृत्तीकरिता ज्या विद्यार्थ्यांनी वरील परिपत्रकानुसार ऑनलाईन नामांकन अर्ज भरून आपल्यामार्फत विद्यापीठ कार्यालयाकडे पाठविले नाहीत. अशा विद्यार्थ्यांच्या तक्रारी/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

संकेतस्थळावर ठेवण्यात आलेल्या यादीतील विद्यार्थ्यांच्या मार्च २०२० परीक्षेमधील मुळ गुणपत्रिकेच्या छायांकित प्रती व अर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या उत्पनाच्या दाखल्याच्या छायांकित प्रती सत्वर या कार्यालयाकडे पाठविण्यात याव्यात. छाननी समितीच्या पुढील बैठकीपुर्वी आपल्याकडून प्राप्त न झालेस व विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचीत राहीलेस याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या महाविद्यालयाची/अधिविभागाची राहील कृपया याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू

(डॉ. व्ही. डी. नांदवडेकर)

सोबत :— वरील प्रमाणे

**प्रत माहितीसाठी**

१) स्विय सहायक, मा. कुलगुरु, यांचे कार्यालय
२) स्विय सहायक, मा. प्र— कुलगुरु यांचे कार्यालय
३) स्विय सहायक,मा. कुलसचिव, यांचे कार्यालय
४) स्विय सहायक, मा. वित्त व लेखाधिकारी, यांचे कार्यालय
५) स्विय सहायक, मा. प्र.संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांचे कार्यालय
४) प्र. संचालक, इंटरनेट विभाग : सदरचे परिपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर http://www.unishivaji.ac.in/scholarship/Merit-Scholarship-2020-21 ) या लिंकवर प्रसिध्द करण्यात यावे.